लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

## तीन महिन्यांत पर्यायी जागा शोधण्याचे न्यायालयाकडून आदेश

# कांजूरमार्ग कचराभूमी संरक्षित वनक्षेत्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : कांजूरमार्ग येथील कचराभूमीच्या ११९.९१ हेक्टर क्षेत्राला उच्च न्यायालयाने शुक्रवारी पुन्हा संरक्षित वन म्हणून म्हणून घोषित केले. हा निर्णय देताना या क्षेत्राला संरक्षित वनक्षेत्रातून वगळण्याबाबत राज्य सरकारने २९ डिसेंबर २००९ रोजी काढलेली अधिसूचना न्यायालयाने बेकायदा ठरवून रद्द केली.

या प्रकरणी आम्ही एकतर कायदेशीर सल्ला घेऊ किंवा कदाचित सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी लागेल.

**– भूषण गगराणी,**
आयुक्त,

तथापि, कचरा विल्हेवाटीसाठी पर्यायी जागा निश्चित करण्यासाठी न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला तीन महिन्यांची मुदत दिली आहे. त्यामुळे, कांजूरमार्ग कचराभूमीवर महापालिका पुढील तीन महिनेच कचऱ्याची विल्हेवाट लावू शकणार आहे. या क्षेत्राला संरक्षित वन क्षेत्रातून वगळण्याची राज्य सरकारची अधिसूचना वन संवर्धन कायद्याचे उल्लंघन करणारी होती. तसेच, केंद्र सरकारच्या अनिवार्य पूर्वपरवानगीशिवाय ती काढण्यात आली होती, असा निर्वाळाही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती ***(पान ८ वर)***

03/05/2025 | Mumbai | Page : 01
Source : https://epaper.loksatta.com